प्रेसनोट                                                                                    दिनांक २३/०९/२०२०

**आरोपी राजकुमार महालिंग शेटे वय ३५ वर्षे, व्यवसाय– व्यापार, (ग्रामपंचायत तिर्थवाडी सरपंच यांचे पती) रा. तिर्थवाडी ता. चाकुर जि. लातुर यांनी ५०००/–रुपयांची लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांचे एम.आर.इ.जी.एस. अंतर्गत तक्रारदार यांनी त्यांच्या शेतीमध्ये सिंचन विहीर मंजुर करण्यासाठी ग्रामपंचायत तिर्थवाडी यांचेकडे प्रस्ताव दाखल केला होता. त्याप्रमाने साहेबांना सांगुन सिंचन विहीर मंजुर करून घेतो म्हणुन सरपंच मनिषा शेटे यांचे पती राजकुमार शेट्टे हे ७,०००/–रुपये लाचेची मागणी करत असल्या बाबतची तक्रार दिनांक २३/०९/२०२० रोजी प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक २३/०९/२०२० रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी राजकुमार महालिंग शेटे यांनी तक्रारदार यांचे एम.आर.इ.जी.एस. अंतर्गत त्यांच्या शेतीमध्ये साहेबांना सांगुन सिंचन विहीर मंजुर करून देण्याच्या कामात मदत करतो म्हणुन ७,०००/–रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५,०००/–रुपये आता व उर्वरीत २,०००/–रूपये नंतर घेण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी राजकुमार महालिंग शेटे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दिनांक २३/०९/२०२० रोजी विजय जनरल अँन्ड गिफ्ट सेंटर, चाकुर जि. लातुर येथे पाठविले असता आरोपी राजकुमार शेट्टे यांनी ५,०००/–रुपये लाचेची मागर्णा करुन सदर लाचेची रक्कम १४.४९ वाजता पंचासमक्ष विजय जनरल अँन्ड गिफ्ट सेंटर, चाकुर जि. लातुर येथे स्वतः स्विकारली आहे. म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

म्हणून त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन चाकुर येथे कलम ७अ, ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हाचा तपास पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोह/संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, अमोल शिंदे, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :– | मोबाईलक्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– | मोबाईलक्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– | मोबाईलक्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– | मोबाईलक्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– | १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर